# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

२३१०१५५/ २३१५१०१ / २४७०३५७ / २३६५१०१ / २४००४४७

अग्नि/मुका/कडोंमपा/जा.क्र./२०२५/ई–२७ | दिनांक :– १४/०१/२०२५

अग्निशमन व आणिबाणी सेवा कल्याण

प्रति,
**मा. सहाय्यक संचालक,**
नगररचना विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

**विषय :–** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील स. नं./हि. नं. ९३/अ/७२, ९३/अ/६१, सि. सं. नं. १३३७ ते १३४०, १३४२ ते १३४८, मौजे – आयरे, डोंबिवली (पु), ता. कल्याण, जि. ठाणे येथील इमारत क्रं. ३, " ऑर्किडस् स्कुल ", तळ + ०५ मजल्यापैकी फक्त तळ + ०२ मजल्याचे शैक्षणीक इमारत बांधकामास भाग अंतरिम पाहणी अहवाल
**एकुण बिल्टअप एरिया –३९१०.७७ चौ.मी**

**संदर्भ :–** १. वास्तुशिल्पकार श्री. ए. एस. दास्ताने यांचे मार्फत सादर केलेला अर्ज.
२. कुलमुखत्यारपत्रक/मालकः मे. महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ
३. लायसन्स एजन्सी क्र. MFS-LA/RF-163/ RD-155/RP-31 मे. फायर इन्फ्रा यांचे नमुना 'अ' प्रमाणपत्र.
४. जा.क्र.कडोंमपा/नरवी/बांप/डोंबि/२०२२–२३/६९ दि. ०६/०१/२०२३ ची बांधकाम परवानगी.
५. अग्नि/मुका/कडोंमपा/जा.क्रं./२०२२/८८७ दि.१४/१२/२०२२ रोजीचा प्रोव्हिजनल ना हरकत दाखला.
६. साईट व्हिजीट ०९/०१/२०२५
७. मा. उपआयुक्त (अग्निशमन) यांची दिनांक १३/०१/२०२५ रोजीची मंजुरी.

वरील संदर्भिय विषयान्वये कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये स. नं./हि. नं. ९३/अ/७२, ९३/अ/६१, सि. सं. नं. १३३७ ते १३४०, १३४२ ते १३४८, मौजे – आयरे, डोंबिवली (पु), ता. कल्याण, जि. ठाणे, येथील इमारत क्रं. ३, " ऑर्किडस् स्कुल ", तळ + ०५ मजल्यापैकी फक्त तळ + ०२ मजल्याची शैक्षणीक इमारत बांधलेली आहे. सदर इमारतीमध्ये लायसन्स एजन्सी मे. फायर इन्फ्रा यांनी अग्निशमन यंत्रणा व उपकरणे बसविलेली आहेत. अर्जदाराने अग्निशमन यंत्रणेच्या कामाची पुर्तता झाल्याचे नमूद केल्यानुसार सदर अग्निशमन व्यवस्थेची पाहणी करुन खालील अटी व शर्तीचे अधिन राहून अग्निशमन दलाचा अंतरिम पाहणी अहवाल देण्यांत येत आहे.

१. सदरहु अंतरीम पाहणी अहवाल एन.बी.सी. २०१६, युडीसीपीआर २०२० नियम व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ च्या आधिन राहून देण्यात येत आहे.
२. अग्निशमन विभाग यांनी तपासणी केली असता इमारती मधील अग्निशमन यंत्रणा पुरेशी व कार्यान्वयीत आढळलेली आहे.
३. हा दाखला प्राप्त झाल्याचे दिनांकापासून या इमारतीमध्ये बसविलेल्या अग्निशमन यंत्रणा व उपकरणे यांच्या त्रुटी, साहित्य व कमतरता याबाबत अग्निशमन विभाग जबाबदार नाही. अशा सर्व त्रुटी, साहित्य, कमतरता व त्या अनुषंगाने उद्‌भवणारे वाद, त्रुटी पूर्ण करुन देण्याची जबाबदारी विकासकांची/ठेकेदारांची आहे.
४. अग्निशमन यंत्रणेची माहिती व तिचा आपात्प्रसंगी वापर, देखभाल या बाबत शैक्षणीक इमारतीमधील कर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण लायसन्स एजन्सी, मे. फायर इन्फ्रा यांनी द्यावी.

५. इमारतींमधील अग्निशमन यंत्रणा चालू व सुस्थितीत असल्याचे प्रात्यक्षिक देवुन व बसविलेल्या साहित्याचे यादीसह कर्मचाऱ्यांना अथवा शिक्षण संस्थेच्या पदाधिकारी/महानगरपालिका प्राधिकरण यांचे ताब्यात लेखी स्वरुपात देण्याची जबाबदारी विकासक यांची आहे.

६. या विभागाकडून पहाणी केल्यानंतर सोसायटी हस्तांतर होईपर्यंत सदरची यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित ठेवण्याची जबाबदारी विकासकांची/ठेकेदाराची व सोसायटी हस्तांतर झाल्यानंतर इमारतीमधील यंत्रणा पुढे योग्य व चालु स्थितीत ठेवण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन यांची आहे. त्याकरीता विकासकांनी सोसायटी रजीस्ट्रेशन होईपर्यंत अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत व कार्यक्षम ठेवण्याची हमीपत्र दिले आहे. सदर हमीपत्राची प्रत शिक्षण संस्थेस/भोगवटाधारकास देण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

७. अग्निशमन यंत्रणा/बुस्टर पंप, बुस्टर पंप स्टार्टर, इत्यादी ठळकपणे दिसतील असे साईनबोर्ड लावावे.

८. अग्निशमनासाठी बांधलेल्या ओव्हरहेड टँक/अंडरग्राऊंड टँकमध्ये कोणतेही फेरफार करू नये. अग्निशमनासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध ठेवण्याची जबाबदारी विकासक/ठेकेदार गृहसंस्थेची आहे.

९. विकासकांनी अग्निशमन उद्‌वाहन बसवुन घ्यावे अन्यथा अग्निशमन अंतरीम पाहणी अहवाल रद्द समजण्यात येईल.

१०. इमारतीच्या बांधकामामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे अंतरिम पहाणी अहवाल रद्द झाले असे समजण्यात येईल.

११. अग्निशमन वाहन इमारतीच्या जवळ येण्याजाण्या करीताचा मार्ग खुला/मोकळा ठेवण्याची जबाबदारी विकासक/शाळा व्यवस्थापनाची आहे.

१२. नकाशामध्ये दाखविलेल्या नियोजनामध्ये पुर्व परवानगी शिवाय बदल करू नये.

१३. नगर रचना विभागाने ज्या शर्तीच्या अधिन राहून इमारतीच्या बांधकामाबाबत परवानगी दिली आहे त्यासाठी त्याचा वापर करण्यात यावा.

१४. तळ घरातील बाहेर जाण्याचे मार्ग अपातप्रसंगी खुले राहतील याची दक्षता घ्यावी.

१५. तळघरामध्ये ज्वलनशिल पदार्थ / विस्फोटक यांचा साठा करू नये. तसेच एल.पी.जी. चा वापर करण्यात येवू नये. तळघरामध्ये हवा खेळती राहण्यासाठी योग्य ती वायुविजनाची व्यवस्था असावी.

१६. सदर दाखला हा फक्त इमारती मधील अग्निशामक यंत्रणा तपासून देण्यांत आला असून महानगरपालिकेकडून अंतिम वापर परवाना प्राप्त होण्यासाठी आवश्यक असलेले इतर खात्याचे ना हरकत दाखले घ्यावेच लागतील.

१७. कॅपिटेशन फी मध्ये काही फरक असल्यास सदरची रक्कम भरण्याची जबाबदारी विकासक/भोगवटाधारक यांची राहील.

१८. अग्नि सुरक्षा व बचाव कार्यासाठी फायर इव्हॅक्युएशन ड्रील प्रत्येक सहा महिन्यातुन करून घेण्याची जबाबदारी विकासक/ठेकेदार व शाळा व्यवस्थापन यांची आहे.

१९. वेळोवेळी अग्निशमन विभागास तपासणीसाठी सहकार्य करावे.

२०. सदरहू अंतरीम पाहणी अहवाल हा निवासी इमारतीमधील अग्निशमन यंत्रणेचे पाहणी करुन देण्यात येत आहे. इमारती मधील इतर व्यवसायाकरीता आवश्यकता व नियमानुसार अग्निशमन विभागाचे ना हरकत दाखला घेऊन व्यवसाय करणेबाबत सुचीत करण्यात येत आहे.

२१. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये वर्षातून दोनदा जानेवारी व जुलै महिन्यामध्ये अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित असल्याबाबतचे 'ब' प्रमाणपत्र लायसन्स अभिकरणाकडुन घेवून अग्निशमन विभागाकडे सादर करणे सोसायटी रजिस्ट्रेशन होईपर्यंत विकासकाची व त्यानंतर शाळा व्यवस्थापन यांची आहे. सदरहु बाब विकासक/गृहसंस्था पदाधिकारी यांना कायद्याने बंधनकारक आहे.

२२. प्रतिवर्षी जानेवरी व जुलै महिन्यात विहित नमुना 'ब' प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून सदर प्रमाणपत्राच्या अनुषंगाने वार्षिक फी जानेवारी/जुलै महिन्यात भरण्यात यावी. अन्यथा उशीर झाल्यास नियमानुसार दंडासह फी भरणा करणे अनिवार्य राहिल.

२३. पावती क्रं. २९३१८ दि. १४/१२/२०२२ अन्वये कॅपिटेशन फी रु. ५,००,०००/—मात्र जमा.

(कल्याण डोंबिवली महानगरपालिका — अग्निशमन व आणिबाणी सेवा)

मुख्य अग्निशमन अधिकारी
अग्निशमन व आणिबाणी सेवा
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

प्रत : वास्तुशिल्पकार — श्री. ए. एस. दास्ताने
योग्य ती पूर्तता करुन घेण्यासाठी.

MANAGER
ORCHIDS THE INTERNATIONAL SCHOOL
DNC CAMPUS, D.N.C ROAD,
DOMBIVLI (EAST), DIST. THANE 421 201.

PRINCIPAL
ORCHIDS THE INTERNATIONAL SCHOOL
DNC CAMPUS, D.N.C ROAD,
DOMBIVLI (EAST), DIST. THANE 421 201.